**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **अमेरिकेचा दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी परतले, व्यापार, उद्योग, संरक्षण आणि सुरक्षा, ऊर्जा, तसंच दोन्ही देशांच्या नागरिकांमधल्या परस्पर संबंधांसह विविध मुद्द्यांवर उच्च स्तरीय द्विपक्षीय चर्चा.**
2. **नागपूरमध्ये व्हेरिएबल एनर्जी सायक्लोट्रॉन सेंटर साकारणार, सायक्लोट्रॉन केंद्र साकारण्यासाठी एक कृतीगट स्थापन करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले निर्देश.**
3. **मुख्यमंत्री कक्षाच्या धर्तीवर राज्यात कृषिमंत्री कक्षाची स्थापना करणार - कृषिमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांची अमरावतीत घोषणा.**
4. **38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा आज समारोप, महाराष्ट्राने जिंकली सर्वात जास्त १९८ पदकं.**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी-अमेरिका दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला दोन दिवसांचा अमेरिका दौरा आटपून आज मायदेशी परत यायला निघाले. याआधी ते फ्रान्सच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर होते. आपल्या अमेरिकेच्या दौऱ्यात त्यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासह तिथल्या अनेक वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली. ट्रम्प यांनी जानेवारी महिन्यात दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर भारताबरोबरची ही पहिलीच द्विपक्षीय चर्चा होती. पंतप्रधान मोदी यांच्या अमेरिका भेटीत दोन्ही देशांमध्ये व्यापार, उद्योग, संरक्षण आणि सुरक्षा, ऊर्जा, तसंच दोन्ही देशांच्या नागरिकांमधल्या परस्पर संबंधांसह विविध मुद्द्यांवर उच्च स्तरीय द्विपक्षीय चर्चा झाली. भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर वर एकत्रितपणे काम करण्यावर दोन्ही देशांमध्ये यावेळी सहमती झाली. पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात काल व्हाईट हाऊस मध्ये झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त निवेदन जारी केलं. यावेळी दोन्ही देशांमध्ये १६ वर्षांपूर्वी झालेल्या ऐतिहासिक नागरी अणू करारा अंतर्गत, भारतात अमेरिकी डिझाईनच्या आण्विक भट्ट्यांची निर्मिती करण्याच्या दिशेने पुढे जाण्यावर दोन्ही नेत्यांमध्ये सहमती झाली. मुंबई दहशतवादी हल्ल्यासारख्या कारवाया रोखण्यासाठी अल-कायदा, आयसिस (ISIS), जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तय्यबा यासारख्या दहशतवादी गटांविरोधात सहकार्य मजबूत करण्यासाठी वचनबद्ध राहण्याचा दोन्ही नेत्यांनी यावेळी संकल्प केला. देशाच्या नागरिकांचं नुकसान करणाऱ्यांना शासन करण्याची सामायिक गरज लक्षात घेता, मुंबई हल्ल्यांमधला आरोपी, तहव्वुर राणाचं भारताला प्रत्यार्पण करायला अमेरिकेनं मंजुरी दिली. पाकिस्ताननं आपल्या भूमीचा वापर

दहशतवादी कारवायांसाठी होणार नाही याची काळजी घ्यावी, असं आवाहन दोन्ही नेत्यांनी केलं.

**परीक्षा पे चर्चा**

शाळेत जसे वेगवेगळे विषय असतात त्याचप्रमाणे आपल्या आहारातही वैविध्य असायला हव अस मत पोषक आहार आणि शारिरीक तंदुरुस्ती आणि तज्ञ तसच  लेखिका ऋजुता दिवेकर यांनी परीक्षा पे चर्चा कार्यक्रमात आज विद्यार्थ्यंना मार्गदर्शन करताना व्यक्त केल.

***एग्जाम के लिए खाते हैं तो जैसे एग्जाम में अलग अलग सब्जेक्ट्स होते हैं। वैसे हमारे खाने में भी विविधता आनी चाहिए। कुछ खाने ऐसे हैं जो की नेचुरल तो है ही पर डी स्ट्रेसर्स भी है। हम लोग जिसको शेंगदाणा या मूंगफली कहते हैं तो शेंगदाणा से स्ट्रेस कम होता है। एनर्जी ड्रिंक्स से स्ट्रेस बढ़ता है और दूसरा है केला, केला हर किसी को खाना चाहिए, पेट भी उससे एकदम  सिर्फ फ्लैट ही नहीं, लेकिन उसमें शांत भी लगता है और तीसरी चीज चावल जीस तरीके से भी आप चावल खाना चाहते हो वो खाइए लेकिन ये तीनों चीजें आपके डाइट में होनी चाहिए।***

शोनाली सभेरवाल आणि रेवन्त हिमतसिन्का यांनी देखील आज मार्डदर्शन केल.

**वाळू माफिया**

वाळू माफियांवर मकोका लावणं, हद्दपार करण या सारख्या कारवाई करण्यात येणार असल्याचं, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं आहे. ते काल अकोल्यात माध्यमांशी बोलत होते. रेती मिळत नसल्यान वाळू माफिया तयार होतात त्यामुळे आता मुबलक प्रमाणात रेती मिळेल आणि लवकरच नवं चांगलं वाळू धोरण जाहीर करू, यामध्ये कडक कायदे असतील असं बावनकुळे यांनी सांगितलं.

***चांगलं वाळू धोरण घेतलेलं आहे त्यातलं आपल्याला गावातल्या घरकुलांना गावातल्या रेतीमध्ये सर्वसामान्य जनतेला कुठलाही त्रास होणार नाही आणि आता शंभर टक्के पी.डब्लु.डी. आणि एरिगेशन किंवा शासकीय विभागाला आम्ही सांगितलं आहे कि जेवढ मोठ्या प्रमाणावर रेती आता लोंकाना रिव्हर सॅण्ड ची गरज पडणार नाही एम.सॅण्ड किंवा दगडावरची किंवा गिट्टीवरून तयार केलेली रेती वापरता येईल.***

**सायक्लोट्रॉन**

पार्टीकल अॅक्सीलरेटर तंत्रज्ञान पूर्वी संशोधनासाठी मर्यादीत होत. आता ती कॅन्सर सारख्या दुर्धर आजारावर उपचारासह शिक्षणाच्या नव्या ज्ञानशाखेसह एक सामाजिक गरज झाली आहे. भारतातील सद्यस्थितीत अवघे 24 सायक्लोट्रॉन केंद्र कार्यान्वित असून पाश्चिमात्य राष्ट्राच्या तुलनेत विचार करता आणखी एक हजार केंद्राची आवश्यकता आहे. नागपूर येथील वैद्यकीय आणि अभियांत्रिकी पायाभूत संस्था उपलब्ध असून सायक्लोट्रॉन केंद्र साकारण्यासाठी एक कृतीगट स्थापण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.याचबरोबर या प्रकल्पासाठी जागेच्या उपलब्धतेबाबत प्रस्ताव सादर करा असं जिल्हाधिकारी डॉ.इटनकर यांना सांगितल. नागपूर मध्ये व्हीएनआयटी, एम्स, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट सारख्या नावाजलेल्या पायाभूत संस्था उपलब्ध आहेत. याद्दष्टीने विचार करता हे केंद्र नागपूरसह मध्य भारताला मोठी उपलब्धी ठरेल. या केंद्राद्वारे क्लीन एनर्जी, जलशुद्धीकरण, आरोग्य, ऊर्जा अन्य प्रक्रिया सारख्या औद्योगिक क्षेत्राची नवी दालने सक्षम होण्यास मदत होईल, अस एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी आपल्या सादरीकरणात सांगितल.

**पुलवामा**

२०१९ च्या पुलवामा हल्ल्यात वीरमरण आलेल्या जवानांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली. या जवानांचं बलिदान आणि देशाप्रति असलेलं त्यांचं समर्पण येणाऱ्या पिढ्या कधीच विसरणार नाहीत, असं पंतप्रधान म्हणाले. २०१९ ला आजच्या दिवशी जम्मू काश्मीरमधल्या पुलवामा इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाचे ४० जवान शहीद झाले होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही समाजमाध्यमावर पुलवामा हल्ल्यातल्या शाहिद जवानांना आदरांजली वाहिली.

**कृषी मंत्री कक्ष**

शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाकडून अनेकविध योजना आणि उपक्रम राबविण्यात येत आहेत. शासन शेतकऱ्याच्या पाठीशी भक्कमपणे असून शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, अडचणी व समस्या सोडविणे सुकर व्हावे यासाठी विभाग स्तरावर कृषी मंत्री कक्ष स्थापन करण्यात येणार असल्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. अमरावती इथ कृषि मेळाव्याला त्यांनी संबोधित केल. शेतकरी शेतात नवे-नवे प्रयोग करून शेतीचे उत्पन्न वाढवत असतात. कृषी विद्यापीठ, कृषी विभाग आणि शेतकरी यांच्यात समन्वय आवश्यक आहे. कृषी विद्यापीठाने पीक उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांसाठी कृषी संलग्न विविध प्रात्यक्षिके आयोजित करावीत अस त्यांनी सुचवलं.

**नवीन फौजदारी कायदे**

नवीन फौजदारी कायद्यांच्या महाराष्ट्रातल्या अंमलबजावणीचा आढावा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या बैठकीला उपस्थित होते. फॉरेन्सिक लॅब च्या तयारी बाबत त्यांनी यावेळी माहिती दिली....

***महाराष्ट्रामध्ये तिन्ही कायद्यांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे सुरू केलेली आहे.त्यासंदर्भात विशेषता, फोरेन्सिक इन्फ्रास्ट्रक्चर जे आहे ते आम्ही आता मोठ्या प्रमाणात तयार करतो आहोत. त्याचात 27 व्हॅन्स आमचे आलेले आहेत. पुढच्या सहा महिन्यांमध्ये एक कम्प्लीट आमचं फॉरेन्सिक नेटवर्क तयार होईल आणि मग सात वर्षांपेक्षा अधिक ज्याच्यामध्ये सजा आहे अशा प्रत्येक स्पॉटवर फॉरेन्सिक व्हॅन्स जाऊन आणि तिथेच सगळ्या प्रकारची साक्षीचं कलेक्शन हे करण्याची योजना आम्ही तयार केलेली आहे.***

**राष्ट्रीय क्रीडा**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप उत्तराखंडमधल्या हल्दवानी इथं आज झाला. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनामुळे उत्तराखंड ही देवभूमी आता खेलभूमीमध्ये परिवर्तित झाली असून इथले मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी उत्तराखंडला 21व्या स्थानावरून सातव्या स्थानावर आणण्याचे परिश्रम घेतल्याचे गौरव उद्‌गार गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काढले यावेळी, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, केंद्रीय क्रीडा आणि युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे आणि ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी.टी.उषा यांची या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती यंदाच्या क्रीडा स्पर्धेत देशभरातल्या खेळाडूंनी १ हजार ५२३ पदकांची लयलूट केली. यात ४५७ सुवर्ण, ४५५ रौप्य आणि ६११ कांस्य पदकांचा समावेश झाला. पदकतालिकेत सेना दल संघ पहिल्या क्रमांकावर आहे. ६८ सुवर्ण, २६ रौप्य आणि २७ कांस्य पदकांसह त्यांनी एकूण १२१ पदकं जिंकली आहेत. महाराष्ट्राने सर्वात जास्त १९८ पदकं जिंकली आहेत, यात ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७३ कांस्य पदकांचा समावेश आहे. हरियाणा ४८ सुवर्ण, ४७ रौप्य आणि ५८ कांस्य पदकांसह एकूण १५३ पदकं जिंकून तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**अमृत 2 पूर्णांक 0**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत दोन पूर्णांक 0 योजनेअंतर्गत एनएमआरडीए क्षेत्रातील प्रस्तावित 13 गावांना पाणी पुरवण्याच्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली असून यात बेसा ,बेलतरोडी, पिंपळा, घोगली, हुडकेश्वर, शंकरपूर, गोटापांजरी, वेळाहरी, रुई, वरोडा, पांजरी, किर्णापूर, कान्हा ,या गावांचा समावेश करण्यात आलाय.

*****